


# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**
एम.एस.सी., पी.एच.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र.: विकमं/२०१३–१४/६४० दिनांक : १०/०१/२०१४.

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

**विषय:– राज्यस्तरीय स्वरमाधुरी शास्त्रीय गायन व नाटयसंगीत गायन स्पर्धेबाबत.....**

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे – १६ यांचे संयुक्त **विद्यमाने २८ व २९ जानेवारी, २०१४ रोजी 'राज्यस्तरीय स्वरमाधुरी शास्त्रीय गायन व नाटयसंगीत गायन स्पर्धेचे'** आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागांतील इच्छुक विद्यार्थ्यांना वरील स्पर्धेत सहभागी होणेबाबत सूचित करावे व सदर पत्र आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागाच्या सूचना फलकांवर प्रदर्शित करावे, ही विनंती.

कळावे,

**सोबत : राज्यस्तरीय स्वरमाधुरी स्पर्धेचे माहिती पत्र.**

(विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे–४११००७, पुणे विद्यापीठ)

१०/१/१४

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

**विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे – ४११ ००७.**
**☎ ०२० – २५६०११५४ फॅक्स : ०२० – २५६०११५४ मोबाईल : ९८५०१७६५७५**

## स्पर्धेची नियमावली

१) महाराष्ट्र राज्यातल्या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांचे पदवी व पदव्युत्तर विभागांचे विद्यार्थी, विद्यार्थीनी या स्पर्धेत भाग घेऊ शकतील. बहि:स्थ विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

२) एकच स्पर्धक दोन्ही स्पर्धामध्ये स्वतंत्र नोंदणी करुन भाग घेऊ शकतो. प्रत्येक स्पर्धेस वेगळी फी (रु. ५०/-) आहे. ती रोखीने किंवा डी.डी.ने स्वीकारली जाईल.

३) स्पर्धकाने स्वत:च्या महाविद्यालयाचे ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे.

४) शास्त्रीय गायनस्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकाला १५ मिनीटे वेळ दिला जाईल. सादर करावयाचा राग विलंबित व द्रुत अशा पद्धतीने मांडायचा आहे. स्पर्धकाने तानपुऱ्याची व्यवस्था स्वत: करावयाची आहे. इलेक्ट्रॉनिक तानपुरा वापरता येईल. तबला व हार्मोनियम साथीदारांची आवश्यकतेनुसार संयोजकांतर्फे व्यवस्था करण्यात येईल.

५) नाट्यगीत गायनस्पर्धेसाठी जास्तीत जास्त ७ मिनीटे वेळ दिला जाईल. नाट्यगीत मराठी नाटकातलेच असले पाहिजे.

६) गरजेनुसार स्पर्धेच्या नियमांत बदल करण्याचे अधिकार स्पर्धा समितीकडे राहतील.

७) निवासाची व्यवस्था संयोजकातर्फे करता येणार नाही.

८) प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २४.०१.२०१४ राहील.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

सौ. वर्षा जोशी, संयोजिका, स्वरमाधुरी
(पदार्थ विज्ञान विभाग, ९८५०८८६४६१)
डॉ. प्राची रावळ, (वनस्पती शास्त्र विभाग, ९९६००३०८९१)
सौ. श्रुती भातखंडे, (इतिहास विभाग, ९२७३३८६२३०)
महाविद्यालय: ०२०-२५६३४०२१, २५६५०९३१ (फॅक्स)
विद्यार्थी कल्याण मंडळ : ०२०-२५६०११५४,
२५६९७३४ (फॅक्स)



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

**मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय**
**गणेशखिंड, पुणे-१६.**
**आणि**
**विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# राज्यस्तरीय आंतरविद्यापीठीय शास्त्रीय आणि नाट्यसंगीत गायनस्पर्धा

# ‘स्वरमाधुरी’

**कै. शंकरराव कानिटकर स्मृती करंडक**
**शास्त्रीय गायनस्पर्धा**
**कै. शंकरराव कानिटकर स्मृती पारितोषिक**
**नाट्यसंगीत गायनस्पर्धा**

स्पर्धा : मंगळवार दि. २८.०१.२०१४ आणि
बुधवार, दि. २९.०१.२०१४ रोजी सकाळी १० वाजल्यापासून
बक्षीस वितरण समारंभ
दि. २९.०१.२०१४ रोजी सायंकाळी ४ वा.

**माध्यम प्रायोजक :**
विद्यावाणी रेडिओ (एफ.एम. रेडिओ)
पुणे विद्यापीठ, पुणे

**स्थळ**
**मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे-१६**
**(नॅक मूल्यांकन ‘अ’ दर्जा)**
**पाषाण रोड (पुणे विद्यापीठ गेटसमोर)**
**येथील दृक्-श्राव्य सभागृह**

www.moderncollegegk.org

## ‘स्वरमाधुरी’ विषयी

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड शैक्षणिक यशाबरोबरच सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातही अग्रेसर आहे. २०१०-११ मध्ये नॅक पुनर्मूल्यांकन समितीने महाविद्यालयास ‘अ’ दर्जा बहाल केला आहे. पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २००८-०९ चा ‘उत्कृष्ट महाविद्यालय’ हा पुरस्कार देऊन या महाविद्यालयास गौरविले आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कै. शंकरराव कानिटकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून ‘स्वरमाधुरी’ ही शास्त्रीय गायनस्पर्धा आमचे महाविद्यालय सातत्याने आयोजित करीत आहे. तरुणांमधील पाश्चिमात्य संगीताचा वाढता प्रभाव लक्षात घेता अभिजात भारतीय संगीताचा वारसा टिकविण्यासाठी आणि पुढे नेण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी समजल्या जाणाऱ्या पुणे येथील पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत घेतली जाणारी ही एकमेव आंतरविद्यापीठीय शास्त्रीय गायनस्पर्धा आहे. संस्थेच्या अमृतमहोत्सवानिमित्त (२००८-०९ पासून) ही स्पर्धा जास्त व्यापक करुन त्यात मराठी नाट्यसंगीत गायनस्पर्धेचाही समावेश करण्यात आला आहे.

या स्पर्धेची लोकप्रियता आणि आगळेवेगळे स्वरुप लक्षात घेऊन पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाने २००५-०६ पासून या स्पर्धेस आर्थिक साहाय्य केले आहे. शैक्षणिक विकासाबरोबरच कला क्षेत्रातही विद्यार्थी पारंगत व्हावे यासाठी प्रोत्साहन देण्याचे विद्यार्थी कल्याण मंडळाचे उद्दिष्टसुद्धा यात साध्य होताना दिसते. २००८-०९ पासून पुणे विद्यापीठाच्या ‘विद्यावाणी’ या एफ.एम. वाहिनीचे स्पर्धेसाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे.

डॉ. मालती पांडे-बर्वे, छोटा गंधर्व, गजानन वाटवे, पं. राम माटे, योगिनी जोगळेकर, डॉ. सुचेता भिडे-चापेकर, पं. जानोरीकर, डॉ. विकास कशाळकर, मधुवंती दांडेकर यांसारख्या अनेक नामवंत आणि लोकप्रिय कलाकारांनी परिक्षक/ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून या स्पर्धेस आशीर्वाद दिले आहेत. या स्पर्धेतील अनुराधा कुबेर, पुष्कर लेले, आरती ठाकूर, सानिया पाटणकर, मंदार गाडगीळ,.. असे अनेक स्पर्धक उदयोन्मुख कलाकार म्हणून रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत.

नाव नोंदणीसाठी : swaramadhuri.mgk@gmail.com

## पारितोषिकांचे स्वरुप

### स्वरमाधुरी शास्त्रीय गायन स्पर्धा

**प्रथम क्रमांक**

कै. शंकरराव कानिटकर स्मृती करंडक (फिरता चषक)

**कै. कु. संगीता रवींद्र व्होरा यांच्या स्मरणार्थ रोख पारितोषिक रु.३०००/-**

व कै. सौ. विजया राजाराम जोशी यांच्या स्मरणार्थ स्मृतिचिन्ह.

**द्वितीय क्रमांक**

**कै. पुरुषोत्तम विठ्ठल चिंचाळकर स्मरणार्थ रोख रु.२०००/-**

व कै. मधुकर गोपाळ देशपांडे यांच्या स्मरणार्थ स्मृतिचिन्ह.

**तृतीय क्रमांक**

**कै. केशव गोपाळ जोशी स्मरणार्थ रोख रु. १०००/-**

व कै. मधुकर गोपाळ देशपांडे यांच्या स्मरणार्थ स्मृतिचिन्ह.

### स्वरमाधुरी नाट्यसंगीत गायन स्पर्धा

**प्रथम क्रमांक**

कै. शंकरराव कानिटकर स्मृती करंडक (फिरता चषक)

**कै. श्री. गणेश हरी रानडे यांच्या स्मरणार्थ रोख रु. १५००/-**

**द्वितीय क्रमांक : रोख रु. १२००/-**

कै. सरस्वतीबाई वैद्य यांच्या स्मरणार्थ

**तृतीय क्रमांक : रोख रु. १०००/-**

प्रा. सौ. श्रुती भातखंडे यांच्या तर्फे

स्मृतिचिन्हे प्राचार्य डॉ. संजय खरात यांच्यातर्फे

### सल्लागार समिती

**डॉ. पंडित शेळके**

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे.

**डॉ. गजानन एकबोटे**

अध्यक्ष, नियामक मंडळ, प्रो.ए.सो., शिवाजीनगर, पुणे ५.

**डॉ. आनंद देशमुख**

संचालक, विद्यावाणी (एफ.एम. रेडिओ), पुणे विद्यापीठ, पुणे)

**प्रा. प्रकाश दीक्षित**

(उपकार्यवाह, प्रो. ए. सोसा., शिवाजीनगर, पुणे ५)

(व्हिजीटर, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे १६.)

**प्रा. सुरेश तोडकर**

(अध्यक्ष, स्था.व्य.स. मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे १६.)

(सहकार्यवाह, प्रो. ए. सोसा., शिवाजीनगर, पुणे ५)

**डॉ. संजय खरात**

(प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे १६.)

**प्रा. वर्षा जोशी**

संयोजिका, ‘स्वरमाधुरी’